तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk१०@dte.org.in Internet : www.dte.org.in

अधिसूचना

क्रमांक : १०/एडीएम/पदविका/जनरल अधिसूचना/प्रमाणपत्रे/२०१५/ ३७३
दिनांक : 10 APR 2015

विषय:- पदविका अभियांत्रिकी व तत्सम अभ्यासक्रमासाठी प्रवेशा संदर्भात शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी., पोस्ट एच.एस.सी. व थेट व्दितीय वर्ष व्यावसायकि पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत...

प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी., पोस्ट एच.एस.सी. व थेट व्दितीय वर्ष व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांनी केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेचा प्रवेश अर्ज सादर करतेवेळी शासन नियमानुसार विहित नमुन्यातील प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी., पोस्ट एच.एस.सी. व थेट व्दितीय वर्ष व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांस केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे व अन्य कोटयातील यादीतील प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमासाठी आवश्यक प्रमाणपत्रे प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापुर्वी प्राप्त करुन घ्यावीत. जेणेकरुन त्यांना प्रवेशाचे वेळी अडचणींना सामोरे जावे लागणार नाही. प्रवेशाची प्रक्रिया एसएससी/एचएससी २०१५ चा परीक्षेचा निकाल जाहीर होताच सुरु केली जाते.

- जात प्रमाणपत्र (Caste Certificate): सर्व मागासवर्गीय उमेदवारांना सर्व अभ्यासक्रमासाठी लागू:
  मागास प्रवर्गातुन प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार हे महाराष्ट्र राज्यातीलच असावेत. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी उमेदवाराची जात महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या अधिकृत यादीमध्ये मोडत असल्याचे संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाने दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रामध्ये मायग्रेशन अथवा जात महाराष्ट्रबाहेरील राज्यातील आहे असे नमूद केलेली जात प्रमाणपत्र मागासवर्गीय उमेदवार म्हणून प्रवेशासाठी ग्राहय धरली जाणार नाहीत. अशी प्रमाणपत्रे सादर करुन प्रवेश घेतल्यास कोणत्याही टप्प्यावर सदर उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्यात येईल व त्यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, या बाबीची नोंद घ्यावी.
- नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate):
  महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. सीबीसी १०/२००८/प्र.क्र.६९७/मावक-५, दि. १३.१.२००९ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरित सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटाचे (नॉन क्रिमी लेअरचे) तत्व लागू केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित प्राधिकाऱ्यांनी दिलेले दि. ३१.०३.२०१६ पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) उपरोक्त नमूद केलेल्या सर्व अभ्यासक्रमासाठी लागू राहील.



१६४८ २०/०४/१५

- <u>जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate):</u>
फी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी संबंधित विभागातील अधिकाऱ्याने जात वैधता प्रमाणपत्राची मागणी अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग. उमेदवारांनी संबंधित समाज कल्याण विभागातील छाननी समितीने दिलेले "जात वैधता प्रमाणपत्र" आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांने आदिवासी विकास विभागातील छाननी समितीने दिलेले "जात वैधता प्रमाणपत्र" सादर करणे आवश्यक आहे. जर संबंधित उमेदवार "जात वैधता प्रमाणपत्र" सादर करण्यास अपयशी ठरल्यास त्याला/तिला खुल्या प्रवर्गातील उमेदवाराप्रमाणे शिक्षण शुल्क व इतर फी भरावी लागेल.

- <u>अधिवास प्रमाणपत्राबाबत (Domicile Certificate) :</u>
शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टिईएम-२०१०/(११०/१०)/तांशि-४, दिनांक १३.६.२०११ नुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी टाईप ए विद्यार्थ्यांच्या बाबतीत अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असली तरी अधिवास प्रमाणपत्र विद्यार्थ्यांकडे उपलब्ध नसल्यास त्या विद्यार्थ्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा दाखला (बर्थ सर्टिफिकेट) सादर करणे आवश्यक आहे किंवा सदर विद्यार्थ्यांकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला नसल्यास त्या विद्यार्थ्यांने शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या विद्यार्थ्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे या बाबीची नोंद घ्यावी.

संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्जाच्या स्वीकृतीवेळी जर आवश्यक प्रमाणपत्रे संबंधित उमेदवार सादर करु शकला नाही. तर त्यास संबंधित वर्गवारीतील प्रवेशासाठी फायदा मिळणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, याची नोंद घ्यावी.

प्रवेशाबाबतची इतर सर्व माहिती या संचालनालयाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. अधिक माहितीसाठी या संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांकडेही संपर्क साधता येईल.

The 6 Regional Offices of Directorate of Technical Education,Maharashtra State

| Designation/ Name | Address | Contact Nos. & Email | Districts |
|---|---|---|---|
| Mumbai Region | | | |
| Joint Director | Technical Education Regional Office,World Bank Project Building, Govt. Polytechnic Campus, ४९-Kherwadi, Aliyawar Jung Marg, Bandra(East), Mumbai-४०००५१ | Phone : 022-26474892,26471619 Fax : 022-26474892,26471619 Email :romumbai.dte@gmail.com Website :http://www.jdteromumbai.com | Mumbai Urban and suburban, Thane, Raigad, Ratnagiri, Sindhudurg |
| Pune Region | | | |
| Joint Director | Joint Director, Technical Education Regional Office, ४१२-E, Shivaji Nagar, Bahirat Patil Chowk, Pune- ४११०१६ | Phone : 020-25656234,25678973 Fax : 020-25656234 Email : ropune.dte@gmail.com Website :http://www.ropune.org.in/ | Pune, Kolhapur, Satara, Sangli, Solapur |

| | | | |
|---|---|---|---|
| **Nashik Region** | | | |
| Joint Director | Technical Education Regional Office,<br>New Polytechnic Area, Post Box No. २१७,<br>Samangaon Road, Nashik Road,<br>Nashik - ४२२१०१ | Phone : 0253-2461479,2460114 (P)<br>Fax : 0253-2455301<br>Email :ronsk_nsk@sancharnet.in<br>rdtenashik@dte.org.in<br>ronashik.dte@gmail.com<br>Website : http://www.dtensk.org | Ahmednagar, Jalgoan,<br>Dhule, Nashik,<br>Nandurbar |
| **Aurangabad Region** | | | |
| Joint Director | Joint Director, Technical Education Regional Office Station Road, Osmanpura,Near Govt.Polytechnic campus, P.O. Box No.११९ Aurangabad-४३१००५ | Phone : 0240-2334216(P),<br>2334769 (O)<br>Fax : 0240-2356820<br>Email<br>jdteabad_agd@sancharnet.in<br>rdteabad@dte.org.in<br>roaurangabad.dte@gmail.com<br>Website : http://www.dteau.org | Aurangabad, Beed,<br>Jalna,<br>Latur, Hingoli,Nanded,<br>Parbhani, Osmanabad |
| **Amravati Region** | | | |
| Joint Director | Joint Director, Technical Education Regional Office,<br>Govt.Polytechnic Campus, New Cotton Market Road,<br>Sahkarnagar, Amravati-४४४६०३ | Phone : 0721-2573027<br>Fax : 0721-2577913<br>Email :jdroamt@bom6.vsnl.net.in<br>rdteamt@dte.org.in<br>roamravati.dte@gmail.com<br>Website :http://www.jdroamt.org | Amravati, Akola,<br>Buldhana, Yawatmal,<br>Washim, |
| **Nagpur Region** | | | |
| Joint Director | Joint Director,Technical Education Regional Office,<br>Govt.Polytechnic Campus,Sadar Bazar,<br>Nagpur-४४०००१ | Phone : 0712-2565143,2549387<br>Fax : 0712-2561663<br>Email :dtemag_ngp@sancharnet.in<br>rdtenag@dte.org.in<br>ronagpur.dte@gmail.com<br>Website<br>http://www.rdtenagpur.org.in | Bhandara, Chandrapur,<br>Gondhia, Gadchiroli,<br>Nagpur, Wardha |

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

प्रत:- सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

क्रमांकः-विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०१५/ 9039
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 05/5/2015

S. D. Paschand
प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-१) प्राचार्य, सर्व अनुदानित / विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.